# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र. क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५

**दूरध्वनी :** ०२२ २२१६३९६४/६५/६९ , **फॅक्स :** २२१६३९७६

**ई-मेल :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in

**संकेत-स्थळ :** www.mercindia.org.in/www.merc.gov.in


जाहीरात क्र. ०९/२०१८-१९

## जाहीर सूचना

**सन २०१८ चे प्रकरण क्र. १०४**

**विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ अंतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लिमिटेड (महानिर्मिती कंपनी) यांनी महाराष्ट्र राज्यामध्ये विजेचा राज्यांतर्गत व्यापार करण्याचा परवाना मंजूर करण्यासाठी केलेल्या अर्जावर अभिप्राय मागविण्याबाबत**

१. महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लिमिटेड (महानिर्मिती कंपनी) यांनी, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ अंतर्गत महाराष्ट्रात विजेचा राज्यांतर्गत व्यापार करण्याकरिता त्यांना "अ" वर्गवारीतील परवाना मंजूर करण्यासाठी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे (आयोग) अर्ज केला आहे. महानिर्मिती कंपनीने मुख्यतः महाराष्ट्र राज्यातील कृषी फिडर्सना विजेचा पुरवठा करण्यासाठी सौर प्रकल्पांच्या अंमलबजावणीकरिता वीज व्यापाराचा उपक्रम प्रस्तावित केला आहे.

२. महानिर्मिती कंपनीने अधिनियमाच्या कलम १५(२) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार, लेखी सूचना व हरकती मागविण्यासाठी (१) हिंदुस्तान टाइम्स (इंग्रजी), (२) डीएनए (इंग्रजी), (३) पुढारी (मराठी) आणि (४) सकाळ (मराठी) या वर्तमानपत्रांमध्ये दिनांक २८ जून, २०१८ रोजी जाहीर सूचना प्रसिध्द केली होती, परंतु त्यावर कोणत्याही सूचना किंवा हरकती प्राप्त झाल्या नाहीत.

३. आयोगाचे सकृत्दर्शनी समाधान झाले आहे की, महानिर्मिती कंपनी 'अ' वर्गवारी अंतर्गत सादर केलेल्या व्यापार योजनेनुसार विजेचा राज्यांतर्गत व्यापार करण्यासाठी परवान्याच्या मंजुरीकरिता अर्हताप्राप्त आहे. आयोग, विद्युत अधिनियम, २००३ व विनियमांतील आवश्यकतांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून महानिर्मिती कंपनीला, मविनिआ (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ आणि त्यामध्ये आतापर्यंत करण्यात आलेल्या सुधारणांतर्गत, "अ" वर्गवारीतील वीज व्यापारी म्हणून परवाना, मंजूर करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

४. महानिर्मिती कंपनीच्या अर्जाची प्रत, त्यासोबतच्या परिशिष्ट आणि जोडपत्रांसह, आयोगाच्या www.mercindia.org.in/www.merc.gov.in या संकेत-स्थळांवर किंवा आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

५. वीज व्यापार परवाना मंजुरीच्या प्रस्तावावर अभिप्राय, सूचना किंवा हरकती इंग्रजी किंवा मराठीत, (१+६) प्रतींमध्ये, ही सूचना **आयोगाचे सचिव यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई – ४००००५** येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई-मेलद्वारा (फॅक्स : ०२२-२२१६३९७६, ई-मेलः mercindia@merc.gov.in) **दि. २४ ऑगस्ट, २०१८ पर्यंत** मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात आणि त्यामध्ये पाठविणायाचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेलचा पत्ता, असल्यास, उल्लेख करावा. कोणत्याही संस्थेच्या किंवा कोणत्याही ग्राहक वर्गवारीच्या वतीने प्रतिक्रिया दाखल करण्यात येत असल्यास तसे नमूद करण्यात यावे. सूचना/हरकती पाठविणाया व्यक्तीस सुनावणीच्या वेळी आपले म्हणणे व्यक्तीशः मांडावयाचे असल्यास त्यात तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा म्हणजे अशा व्यक्तीस, **दि. ४ सप्टेंबर, २०१८ रोजी १०.०० वाजता, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई – ४००००५, येथील आयोगाच्या कार्यालयात** होणाया सुनावणीच्या वेळी, जेव्हा महानिर्मिती कंपनीचा वीज व्यापार परवाना मंजूर करण्यासाठीचा अर्ज विचारात घेण्यात येईल तेव्हा, आपले म्हणणे आयोगापुढे मांडण्याची संधी देण्यात येईल. त्यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**दिनांक : २ ऑगस्ट २०१८** — **सचिव**

**ठिकाण : मुंबई** — **महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

Shalini

Size 8 (W) x 15 (H) cm